पुढारी

# ‘रवळनाथ’चे आता संपूर्ण कर्नाटक कार्यक्षेत्र

## वार्षिक सभेत मंजुरी; लवकरच पुणे, कराड, सांगलीतही शाखा : चौगुले

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी लि. आजरा (मल्टी-स्टेट) या संस्थेच्या कार्यक्षेत्रात संपूर्ण कर्नाटक राज्याचा समावेश करण्यास सभासदांनी २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत एकमताने मंजुरी दिली. लवकरच पुणे, कराड व सांगली येथे संस्थेची शाखा सुरू करण्याची घोषणा संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी केली. येथील लायन्स ब्लड बँकेच्या सभागृहात सभा झाली.

चौगुले म्हणाले, केवळ सभासद, ठेवीदार, कर्जदार, ग्राहक आणि हितचिंतकांचा विश्वास आणि पाठबळ, संचालक, सल्लागार व कर्मचाऱ्यांचे योगदान यामुळेच संस्थेने २५ वर्षांच्या वाटचालीचा टप्पा यशस्वीरीत्या पूर्ण केला. विलासचंद हजारे, सदाशिव पिटके, पुष्पा नेसरीकर, विजय हरगुडे यांनी मनोगत व्यक्त केले. चर्चेत सुहास




गडहिंग्लज : रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्सच्या वार्षिक सभेत बोलताना अध्यक्ष एम. एल. चौगुले. व्यासपीठावर प्रा. व्ही. के. मायदेव व संचालक.

नाडगौडा, महावीर मरजे, के. व्ही. येसणे, संदेश गंध यांनी भाग घेतला. सीईओ डी. के. मायदेव यांनी विषयपत्रिकेचे वाचन केले. मागील सभेचा वृत्तांत बोर्ड सेक्रेटरी सागर माने यांनी वाचला. अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकाचे वाचन संस्थापक एम. एल. चौगुले, नफा विभागणी वाचन महेश मजती यांनी, तर अंदाजपत्रक वाचन प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर यांनी केले.

वैधानिक लेखापरीक्षण अहवाल स्वीकृतीवाचन प्रा. विजय कुमार घुगरे यांनी केले. वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीचा ठराव रेखा पोतदार यांनी मांडला. संचालक व नातेवाईकांकडील येणे कर्जाची यादी प्रा. विजय आरबोळे यांनी वाचली. सीईओ मायदेव यांनी पोटनियम दुरुस्तीचे वाचन केले. थकीत कर्ज खाती सूट रकमेचा ठराव उमा तोरगल्ली यांनी मांडला. गडहिंग्लज साखर कारखाना अडचणीतून बाहेर काढण्यासाठी ‘रवळनाथ’ने पुढाकार घ्यावा, असा ठराव प्रा. रमेश पाटील यांनी मांडला. ऐनवेळच्या विषयांना एकमताने मंजुरी देण्यात आली. उद्दिष्टपूर्तीबद्दल चंदगड व कोल्हापूर शाखांचा गौरव करण्यात आला. प्रा. डॉ. दत्ता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव यांनी आभार मानले.

सभेस संचालक मीना रिंगणे प्रा. डॉ. किरण पोतदार, श्री. सुशांत करोशे, डॉ. संजय चौगुले, शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे (बेळगाव), प्राचार्य डॉ. के. एस. पाटील (जयसिंगपूर) प्राचार्य डॉ. पी. एम. हेरेकर (निपाणी), प्राचार्य आर. बी. पाटील (नेसरी), प्रा. डॉ. विनायक आजगेकर, अशोक येजरे (कुडाळ) यांच्यासह शिवशंकर उपासे, नवनाथ शिंदे, बाबासाहेब आजरी, रंगा शिंगटे, संदीप पोडजाळे उपस्थित होते.

Kolhapur Edition
Jul 25, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in